# योजनेचे नाव :- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

१. योजनेचेलाभार्थी

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिलातसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहीत महिला.

२. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-

1. लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक आहे.
2. राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्याआणि निराधार.महिलातसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.
3. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत.
4. सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करणा-या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.
5. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.

३. अपात्रता :-

1. ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे.
2. ज्याच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.
3. सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणा-या आर्थिक योजनेद्वारे दरमहा रु. १५००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचा लाभ घेत असेल.
4. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजीखासदार/आमदार आहे.
5. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/ कॉर्पोरेशन / बोर्ड/ उपक्रमाचे अध्यक्ष / उपाध्यक्ष/ संचालक/ सदस्यआहेत.

६. ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्याकुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत.

७. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित /कायमकर्मचारी म्हणूनसरकारी विभाग/ उपक्रम/मंडळ/ भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिकसंस्थेमध्येकार्यरतआहेत किंवा सेवानिवृत्ती नंतरनिवृत्तीवेतन घेत आहेत. तथापि रु. २.५० लाखापर्यंत उत्पन्न असलेले बाहय यंत्रणाद्वारेकार्यरत असलेलेकर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटीकर्मचारी पात्र ठरतील.

